भारतीय रिझर्व्ह बँक
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
www.rbi.org.in

**कार्यकारी संचालक**

DCBS.CO.BSD- 1/D-1/12.22.183/2019-20 दि. २३ सप्टेंबर २०१९

**बँकिंग रेग्युलेशन अँक्ट,1949 कलम 35 ए अन्वये आदेश**

**(सहकारी संस्थांना लागू असल्या प्रमाणे )**

**पंजाब अँड महाराष्ट्र को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई**

जनहितास्तव पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड , मुंबई यांना काही विशिष्ट आदेश देण्याची आवश्यकता दि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांना वाटत आहे. त्यानुसार, दि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तिला ,बँकिंग रेग्युलेशन अँक्ट, १९४९ च्या ( सहकारी संस्थाना लागू असल्याप्रमाणे ) उप कलम (१ )द्वारे आणि सोबत कलम ५६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार या द्वारे पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड ,मुंबई यांना असे आदेश देत आहे की दि.२३ सप्टेंबर २०१९ रोजीच्या कार्यालयीन कामकाज वेळेच्या समाप्तीनंतर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या लेखी पूर्वपरवानगी विना नवे कर्ज वा उचल (अँडव्हान्स ) देऊ नये,, कोणतीही गुंतवणूक करू नये, कर्ज उभारणीद्वारे तसेच नव्या ठेवींच्या स्वीकृतीद्वारे किंवा बँकेची देणी फेडण्यासाठी देयक अदा करु नयेत तसेच खाली नमूद केलेल्या बाबींव्यतिरिक्त कारणांसाठी आपल्या मालमत्तेची विक्री वा हस्तांतरण करू नये वा त्या विषयीचे करार मदार, समझोते आदि करू नयेत.

१. ठेवींदारांना त्यांच्या बचत , चालू अशा सर्व प्रकारच्या खात्यातून फक्त रु.१००० /-( रुपये एक हजार फक्त ) काढता येतील. पण हा ठेवीदार बँकेचा कोणत्याही प्रकारचा देणेकरी वा कर्जाचा हमीदार असल्यास प्रथम ती त्याच्या कर्जखात्यात जमा करावी.

२.ठेवीदारांच्या ठेवींची मुदतपूर्ती होत असल्यास त्यांचे त्याच व्यक्तीच्या नावे व त्याच व्याजदराने नूतनीकरण करावे.

3.खालील बाबींवर उदभवणारा खर्च बँकेला करता येईल :-

अ.कर्मचाऱ्यांचे पगार

ब. जागेचे भाडे, कर

क. वीज बिल

ड. छपाई , स्टेशनरी इ.

इ .टपाल खर्च इ.

फ. विधीवत न्यायालयीन /रजिस्ट्रार ऑफ को ऑपरेटिव्ह सोसायटीज/ डेट रिकव्हरी ट्रिब्यूनल यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे स्टँप ड्यूटी, रजिस्ट्रेशन शुल्क आदी कायदेशीर बाबींसाठी खर्च करता येईल.

ग. कोर्टाच्या आदेशपूर्तीसाठी कोर्ट फी भरण्याची अनुमती.

ह. वकीलांना प्रत्येक खटल्यामागे कमाल रु. ५००० /- फी देण्यास अनुमती.

ळ. डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशनचे हप्ते भरण्याची अनुमती.

५. बँकेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी , बँकेच्या मतानुसार आवश्यक असणारा खर्च करता येईल. मात्र कोणत्याही बाबींवरील एकूण मासिक खर्च , रिझर्व्ह बँकेच्या या आदेशापूर्वी च्या सहा महिन्यांच्या सरासरी मासिक खर्चापेक्षा तो अधिक नसावा. मात्र त्या बाबीवर पूर्वी खर्च झालाच नसेल तर त्याबाबीवरील खर्च रु. १०००/- पेक्षा अधिक नसावा.

६.सरकारी / एस्एल आर मान्य सिक्युरिटीज मध्ये गुंतवणूक करता येईल.

७.रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनाखाली बँकेच्या विद्यमान सभासदांकडून मासिक तत्वावर भांडवलाकरिता वर्गणी (Contribution)घेता येईल.

८. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना ग्रॅट्यूईटी /प्रॉव्हिडंट फंड फायदे अदा करता येतील.

९. निवृत्त होणाऱ्या आणि निवृत्त झालेल्या कर्मचार्यांना रजा रोकडीकरण व सेवानिवृत्ती लाभ रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने अदा करता येतील.

१० . रिझर्व्ह बँकेच्या सुस्पष्ट लेखी पूर्व परवानगी विना बँकेने कसलीही जोखीम ( दायित्व ) निर्माण करू नये वा नष्ट करू नये.

२. बँकेला,कर्जदारांना त्यांच्या कर्जफेडीसाठी त्यांच्या ठेवींचा वापर करू देण्याची सशर्त अनुमती देता येईल. मात्र :-

अ. अशा खात्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झालेली असावी.

ब. थर्ड पार्टी ने धारण केलेल्या ठेवींबाबत.......

क. कर्जफेडीस आणखी विलंब होण्याची व त्यामुळे ते अनुत्पादित खाते होण्याची शक्यता असेल अशा ठेवीदारांना योग्य अशी पूर्वसूचना देऊन या पर्यायाचा अवलंब करावा आणि

ड.अशा ठेवी किंवा कर्ज फेड यावर कोर्टा आदेश वा अन्य प्रतिबंध नाहीत याचा शहानिशा करावा.

३.बँकेने या आदेशाची प्रत प्रत्येक ठेवीदारांना पाठवावी आणि ती बँकेच्या वेबसाईटच्या होम पेजवर टाकावी.

४. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया , पंजाब अँड महाराष्ट्र को- ऑपरेटिव्ह बँकेला असेही आदेश देत आहे की त्यांनी रिझर्व्ह बँकेच्या आदेशपालनाचा कार्य अहवाल,चीफ जनरल मॅनेजर, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया,डिपार्टमेंट ऑफ को ऑपरेटीव्ह बँक सुपरव्हिजन,,मुंबई रिजनल ऑफिस, सी-८, तळमजला , बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व , मुंबई ४०००५१ याना सादर करावा.

५. २३ ,सप्टेंबर २०१९ च्या कार्यालयीन वेळेनंतरच्या सहा महिन्यांसाठी हे आदेश जारी असतील व त्यांचा आढावा घेण्यात येईल.

**(डॉ. रबी एन.मिश्रा)**

**कार्यकारी संचालक**